# Oct-2018 ISSUE-III, VOLUME-VII(I)

Published Quarterly issue

With ISSN 2394-8426 International Impact Factor 4.374

Peer Reviewed Journal

Published On Date 08.11.2018

Issue Online Available At : http://gurukuljournal.com/

Organized & Published By



Chief Editor,

Gurukul International Multidisciplinary Research Journal

Mo. +919273759904 Email: chiefeditor@gurukuljournal.com

Website : http://gurukuljournal.com/

ISSN No. 2394-8426
Oct-2018
Issue–III, Volume–VII(I)

## INDEX



| Paper No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Securities Market and Role of SEBI | Dr. Rajesh Gaidhani | 1-4 |
| 2 | E-Learning: Issues and Challenges | Dr.Sulbha B. Mule | 5-14 |
| 3 | Multifarious Retaliation of the Protagonists at the Backdrop of Religional 'Otherizing' w.r.t. 'New York' and 'My Name is Khan' | Prof. Sulok B. Raghuwanshi | 15-26 |
| 4 | Share Market And Causes Of Stock Prices To Change | Dr. Rajesh Gaidhani | 27-29 |
| 5 | Philosophical Fragments in Beckett's Works | Prof. Nitin Vinayakrao Gohad | 30-34 |
| 6 | जी.एस.टी.(GST)-एक आढावा | प्रा. रेखा बबाजी मेश्राम | 101-104 |
| 7 | संत साहित्यातील सामाजिक बंडखोरी : संत तुकाराम | प्रा.नवाजी घरत | 105-107 |
| 8 | पं.नेहरूंच्या अलिप्तवादी धोरणाचा प्रभाव | प्रा.तानाजी संभाजी माने | 108-112 |
| 9 | पर्यावरणाचे जतन मानवी जीवनाचे संरक्षण | डॉ.किशोर बी.कुडे | 113-117 |
| 10 | पाली वाड्मयातील मानवी मूल्य : बधुत्व मैत्री | प्रा. डॉ.प्रतिभा बी.पखिडे | 118-121 |
| 11 | आदिवासींची ओळख व सामाजिक शोषण | प्रा.डॉ.रणधीर साठे | 122-124 |
| 12 | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा चंद्रपूर जिल्ह्याच्या ग्रामीण आदिवासी भटक्या जातीतील जनतेच्या दारिद्र्यस्तरावर होणाऱ्या प्रभावाचे अध्ययन | प्रा. डॉ. उत्तम चि. घोसरे | 125-128 |
| 13 | Private Sector In Indian Economy | Dr. Patel Bilquis Hasanali | 129-131 |

# पं. नेहरुच्या अलिप्ततावादी धोरणाचा प्रभाव

प्रा. तानाजी संभाजी माने
राज्यशास्त्र विभागप्रमुख
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर

**प्रस्तावना :–**

शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर अलिप्ततावादाच्या प्रासंगितकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात असले तरी अलिप्ततावादी चळवळीचे जागतिक शांततेच्या स्थापनेतील योगदान नाकरता येत नाही. पारतंत्र्याखालील राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार, साम्राज्यवाद, वशंवाद, वसाहतवादाला विरोध आणि आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरीकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांना आपल्या समस्या मांडण्यासाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचे महत्वपूर्ण कार्य अलिप्ततावादाने केले आहे. म्हणुन व्दितीय महायुध्दोत्तर आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करतांना अलिप्ततावादाची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. म्हणजेच व्दितीय महायुध्दानंतरच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरुपात बदल घडवुन आणणारे एक महत्वपूर्ण घटक म्हणून अलिप्ततवादाचा उल्लेख केला जातो.[१] व्दितीय महायुध्दानंतर जगाची विभागणी ही दोन गटात झाली होती एका गटाचे नेतृत्व भांडवलशाही अमेरिका करीत होता, तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व साम्यवादी रशिया करीत होता. या दोन्ही महासत्तेत आपले प्रभाव क्षेत्र वाढविण्यासाठी म्हणजे आशिया, आफ्रिका व लॅटीन अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांना आपल्या गटात ओढण्यासाठी सत्तास्पर्धा सुरु झाली, याच कालावधीत साम्यवादी नेते स्टॅलिन व माओ यांनी संपूर्ण जग हे फक्त दोनच गटात विभाजीत झाले आहे, असे मानुन तिसऱ्या स्वतंत्र गटाचे अस्तित्वच नाकारले होते. शीतयुध्दामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात शस्त्रीकरण, लष्करी करार व संघटनांची स्थापना, नवसाम्राज्यवाद, नववसाहतवादला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. अशा परिस्थितीत मागास व विकसनशील नवस्वतंत्र राष्ट्रांसमोर स्वत:चे अस्तीत्व टिकविण्याबरोबरच देशाचा विकास व राष्ट्रीय हीत साध्य करण्याचे कठिण आव्हान होते. यावेळी या देशांसाठी अलिप्ततवादाचे धोरण म्हणजे एक आशेचा किरण ठरला. त्यांच्या राष्ट्रीयहित व स्वतंत्र परराष्ट्र धोरणाच्या अभिलाषेला अलिप्ततावादाच्या माध्यमातून एक नवसंजवनी मिळाली.

**ii) भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विकास व अलिप्ततावाद :–**

अलिप्ततावादी चळवळीच्या संस्थापक राष्ट्रांपैकी भारत हे एक राष्ट्र होय. भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच करायला सुरुवात केली होती. इ.स.१८८५ साली राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेपासूनच भारतीय नेत्यांनी आंतरराष्ट्रीय घडामोडीविषयी मत, विचार व्यक्त करायला सुरुवात केली. महात्मा गांधीजीचा भारतीय राष्ट्रीय स्वांतत्र्य आंदोलनात उदय झाल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसला आंतरराष्ट्रीय विषयक दृष्टीकोन दिला महात्मा गांधीजीचा जागतिक शांतता व आंतरराष्ट्रीय सद्भाव यात विश्वास होता. त्यांनी अहिंसेचा सिध्दांत भारतासह संपूर्ण विश्वाला दिला. त्यानंतर महात्मा गांधीजीच्या आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनाचा वारसा पंडीत नेहरुकडे आला. पं. नेहरुनी स्वातंत्र्यपूर्व काळापासुनच आंतरराष्ट्रीय घडामोडीकडे विशेष लक्ष देवू लागले. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा देण्याचे कार्ये केले. राष्ट्रीय कॉंग्रेस, महात्मा गांधी, पंडीत नेहरु यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्वे ठरविण्यात महत्वाची भुमिका बजावली. वसाहतवादाखालील किंवा पारतंत्र्याखालील असणाऱ्या राष्ट्रांचे स्वतंत्र परराष्ट्र विषयक धोरण असू शकत नाही, या विचारांना छेद देण्याचे कार्य केले. भारतीय नेतृत्वाने जागतिक शांतता, मैत्रीपुर्ण सहअस्तीत्व, निशस्त्रीकरण, साम्राज्यवाद व वसाहतवादाचा विरोध या तत्वाचा सातत्याने पूरस्कार केला. स्वातंत्र्योत्तर काळात जयपूर येथे झालेल्या अधिवेशनाच्या ठरावात भारताच्या शांततावादी आणि अलिप्ततवादी परराष्ट्रीय धारेणाची पहिल्यांदा सुस्पष्ट मांडणी करण्यात आली. या ठरावात 'जगात शातंता ही वंशविव्देष, साम्राज्यवाद आणि वसाहतवाद संपवूनच निर्माण करता येते. गटाचा विचार न करता न्याय बाजूने उभे राहुनच शांततेची निर्मीती होउ शकते ',[२] या जाणिवेचे प्रतिबिंब दिसते.

**iii)अलिप्ततावादाचा अर्थ आणि व्याख्या :–**

अलिप्ततवाद हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे एक आधारभुत सिध्दांत आहे. व्दितीय महायुध्दानंतरची स्थिती आणि राष्ट्रीय हित या अनुषंगाने भारताचे पं. नेहरु, इजिप्तचे नासेर आणि युगोस्लोव्हियाचे मार्शल टिटो यांनी अलिप्ततवादाचा स्विकार केला. त्यानंतर आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांनी अलिप्ततावादाचा स्विकार केला. म्हणजेच अलिप्ततावादाचा स्विकार करणाऱ्या देशांची संख्या झपाट्याने वाढु लागली. 'अलिप्तता' या शब्दाचा प्रयोग करण्याचे श्रेय जार्ज लिस्का यांना दिले जाते.[३] प्रारंभी दोन्ही महासत्ता गटाकडून अलिप्ततावादाकडे संशय व तिरस्काराच्या नजरेने पाहिले जात असे. अलिप्ततावाद म्हणजे निष्क्रियता, तटस्थता किंवा नकारात्मक दृष्टीकोन या प्रमाणेच विचार केला जात असे. जार्ज श्वार्जनबर्गर यांनी ६ धारणावर आधारीत अलिप्ततावादाचा अर्थ स्पष्ट केला आहे. त्या ६ धारणा म्हणजे अलगाववाद,अप्रतिबध्दता, तटस्थता, तटस्थीकरण, एकपक्षवाद, आणि अलगता (असलंग्नता) होय.[४] अलिप्ततावादाचा अर्थ स्पष्ट करतांना पंडीत नेहरुनी गुटनिरपेक्षता म्हणजे तटस्थता नाही किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरचा तिसरा गट नाही तर तो शांततेचा गट आहे अशा प्रकारची भुमिका घेतली होती. पंडीत नेहरूना अलिप्ततावादाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर शांततेचे क्षेत्र अधिक व्यापक बनवायचे होते. तसेच नवस्वतंत्र, मागास, विकसनशील राष्ट्रांच्या हितानुरुप व स्वतंत्र परराष्ट्र नितीचे संचालन करावयाचे होते. या संदर्भात बोलतांना पंडीत नेहरूंनी असे विचार मांडले आहेत की, "अलिप्ततावाद हा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा सिध्दांत आहे. कोणत्याही एका गटात प्रवेश करण्याचा अर्थ म्हणजे आपल्या आवश्यकतेनुरुप नाही तर दुसऱ्या राष्ट्राच्या स्वार्थाच्या पुर्ततेचे साधन होणे होय. आत्मनिर्णयाची पूर्ण श्वास्वती तेव्हाच होवु शकते की, जेंव्हा आपण दुसऱ्याच्या अनुसार नाही तर आपल्या आवश्यकतेनुसार कार्य केले पाहिजे."[५] पंडीत नेहरूनी राष्ट्रीय स्वातंत्र्याचा सिध्दांत म्हणून अलिप्ततावादाचा स्विकार केला होता. त्यांनी निष्क्रिय तटस्थता मान्य नव्हती. आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्या–ज्या ठिकाणी स्वातंत्र्य व न्यायावर अतिक्रमण केल्या जाईल त्या–त्या ठिकाणी त्या अतिक्रमणाविरोधात भारत सक्रिय सहभागी होईल,अशी भुमिका घेतली होती. पंडीत नेहरूंनी स्वांतत्रपुर्व काळापासुनच अलिप्ततावादी चळवळीचा तात्वीक पाया घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाचे संचालन करतांना अलिप्ततावादाचा तत्वज्ञानात्मक विवेचन आणि धोरणात्मक रूपरेषा ठरविण्याचा प्रयत्न केला. पंडीत नेहरू, मार्शल टिटो आणि नासेर यांच्या झालेल्या बैठकीतून अलिप्ततावादाला धोरणात्मक आकार देण्याचा प्रयत्न केला. यातील इ.स.१९५५ साली झालेले बांडूग परिषद हे मैलाचे दगड ठरला. या बाडुंग परिषदेच्या माध्यामातुन आशिया–आफ्रिकन राष्ट्रांकडुन आपल्या प्रादेशिक वादाचे अस्तीत्व जगासमोर मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर इ.स. १९६१ साली बेलग्रेड येथे अलिप्ततावादी राष्ट्राचे पहिले संमेलन बोलविण्यात आले. या संमेलनात अलिप्ततावादाचे ५ मापदंड/तत्वांचा स्विकार करण्यात आला. त्यात स्वतंत्र धोरणाचा स्विकार, वसाहतवादाचा विरोध, लष्करी कराराच्या सदस्यत्वाला नकार, लष्करी महासत्तेशी व्दिपक्षीय करारास विरोध आणि महासत्ता राष्ट्र गटांच्या सत्तासंघर्षाशी कोणताही संबंध नसलेले राष्ट्र अशा राष्ट्रांना अलिप्ततावादाचे सदस्यत्व देण्यात आले. वरील पाच प्रमुख तत्वाबरोबरच जागतिक शांतता, सहअस्तित्व, संयुक्त राष्ट्रांवर विश्वास यावरही भर देण्यात आला.[६]

शांततापुर्ण आंतरराष्ट्रीय समाजाची स्थापना करण्यासाठी भारताने धोरण व तात्वीक आधार मानुन स्विकारलेल्या भुमिकेचे इ.स.१९६१ साली बेलग्रेड येथील समेंलनामुळे त्यास आंतरराष्ट्रीय चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले. प्रांरभी अलिप्ततवाद राष्ट्रांची संस्था ही २५ इतकी होती त्यानंतर त्यात सातत्याने नविन राष्ट्रांची भर पडत गेली परिणामी संयुक्त राष्ट्रसंघ या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या सदस्य राष्ट्रांत अर्ध्यापेक्षा अधिक राष्ट्र हे या चळवळीशी निगडीत आहेत.

**vi) पंडीत नेहरू : अलिप्ततावादी चळवळवरील प्रभाव :–**

पंडीत नेहरूंचा भारतीय राजकारणाच्या व्यासपीठावर उदय झाल्यानंतर विशेषत: इ.स.१९२७ पासुन आंतरराष्ट्रीय पातळीवरील घटना घडामोडींचा सुक्ष्म अभ्यासाला प्राधान्य देउ लागले. पंडीत नेहरूंचा मानवतावादी, लोकशाही समाजवादाचा पुरसकर्ता व शांतीदुत अशा विविध नामाभिधानाने उल्लेख केला जातो. ज्याप्रमाणे पंडीत नेहरू राष्ट्रवादी होते त्याचप्रमाणे आतंरराष्ट्रीयवादी होते. त्यांचे विचार आंतरराष्ट्रीय वादाने ओतप्रोत भरलेले होते. त्यांनी स्वामी विवेकांनद, रविंद्रनाथ टागोर आणि महात्मा गांधी या तिघांच्या विचारांतून आंतरराष्ट्रीय वादाची प्रेरणा घेतली. पंडीत नेहरु राष्ट्रवादाकडे साधन म्हणून आणि आंतरराष्ट्रीयवादाकडे साध्य म्हणून पाहत होते. 'पंडीत नेहरूंना राष्ट्रवादावर खंबीर पाय रोवून आंतरराष्ट्रीयवादाची सेवा साधायाची

होती'.[७] भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनाची जोड देण्याचे कार्य पंडीत नेहरूंनी केले. त्यांच्या मते, स्वतंत्र राष्ट्रेच आंतरराष्ट्रीयत्वाला हातभार लावु शकतात. कारण गुलाम किंवा पारतंत्र्याखालील असणाऱ्या राष्ट्रांच्या मनात स्वता:च्या स्वांतंत्र्य प्राप्तीशिवाय इतर विचार येणे कठीण आहे. तसेच तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थिती विषयी भुमिका मांडत असतांना त्यांना याची खात्री होती की, संपुर्ण विश्व हे एक अविभाज्य व परस्वरालंबी घटकांचे मिळून बनलेले आहे. त्यामुळे कोणत्याच राष्ट्राला एकाकी राहणे शक्य नाही. पंडीत नेहरूंच्या आंतरराष्ट्रीयवाद आणि राजकिय चिंतनांचा केंद्रबिंदू "जागतिक शांतता" हा राहिला आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीयवादाचा पुरस्कार करतांना आंतरराष्ट्रीय समस्यांचे निवारण करण्यासाठी शांतातामय मार्गाचा पुरस्कार केला. त्यासाठी त्यांनी नि:शस्त्रीकरण, संयुक्त राष्ट्रांचे सशक्तीकरण, साम्राज्यवाद, वसाहतवाद, वंशवादाचा विरोध आणि अलिप्ततावाद इ.तत्वांचे समर्थन केले. त्यातील सर्वात महत्वाचा मार्ग म्हणजे अलिप्तावाद होय.

पंडीत नेहरूंनी आंतरराष्ट्रीय परिस्थिती व राष्ट्रीय हित या संबंधी स्विकारलेली तात्विक भुमिका व धोरणातून अलिप्ततावादाला चालना मिळाली. अलिप्ततावादाच्या मुळ सिध्दांची मांडणी, अलिप्ततावादाच्या व्याख्या करणे, अलिप्ततावादाचा प्रचार व प्रसार करणे आणि आशिया, आफ्रिका, लॅटीन अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांना अलिप्ततावादाच्या व्यासपीठावर संघटीत करण्याचे कार्य आदी सर्व कार्यात पंडीत नेहरूंचा सिहांचा वाटा राहीला आहे. म्हणूनच अलिप्ततावादाचे जनकत्व पंडीत नेहरूंकडे जाते. अलिप्ततावादाचे अर्थ स्पष्ट करतांना आणि तात्विक भुमिका स्पष्ट करतांना पंडीत नेहरू म्हणतात की, "असंग्लंता ही तटस्थता नाही किंवा कोणत्याही सत्ता गटाशी बांधलकी नाही. प्रत्येक प्रश्नावर त्याच्या गुणवत्तेनुसार स्वतंत्र निर्णय घेणारी व आंतरराष्ट्रीय राजकारण व त्या अनुषंगाने जबाबदाऱ्यात सक्रीय सहभागी होणारी विदेशी निती म्हणजे असंग्लनतेचे धोरण होय."[८] अलिप्ततावादाचा अर्थ स्पष्ट करण्याबरोबरच त्याच्या मुळ सिध्दांताची मांडणी करण्याचे श्रेय पंडीत नेहरूंना दिले जाते.

पारतंत्र्याखालील, नवस्वतंत्र, मागास व विकसनशिल देशांत अलिप्ततावादाविषयी विश्वास निर्माण करण्याचे कार्य पंडीत नेहरूंनी केले. पाश्चिमात्य व साम्राज्यवादी राष्ट्र भारताच्या अलिप्ततावादी धोरणावर नाराज असतांना सुध्दा त्यांनी अलिप्ततावादावरील आपला विश्वास डळमळीत होउ दिला नाही. तसेच स्वातंत्र्य आंदोलनापासुन साम्राज्यावाद, वसाहवाद व वंशवादाविरोधी धोरण कायम ठेवुन त्यास भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांत स्थान दिले. यामुळे आशिया, आफ्रिकेतील देशांत भारतीयांविषयी आपुलीकीची भावना निर्माण झाली. पंडीत नेहरू आशियायी एकतेचे पुरस्कर्ते होते. आशिया व आफ्रिका देशांचे संघटना निर्माण करण्यासाठी पंडीत नेहरूंच्या पुढाकारातून नवी दिल्ली येथे १९४७ साली एक संमेलन घेण्यात आले. त्यांनतर इ.स. १९४९ मध्ये घेण्यात आलेल्या संमेलनात पंडीत नेहरूंनी इंडोनेशीयाच्या स्वातंत्र्याचा मुद्दा लावुन धरला आणि इंडोनेशीयन स्वातंत्र्य रक्षणसाठी संयुक्त राष्ट्राला आवाहन केले. अशा प्रकारे संपूर्ण आशियायी एकतेचे ठोस अभिव्यक्ती करण्याचे कार्य पंडीत नेहरूंनी केले.

व्दितीय महायुध्दोत्तर शितयुध्दामुळे आशिया व आफ्रिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांनी आपल्या स्वतंत्र अस्तीत्वाच्या रक्षणसाठी अलिप्ततावादाचा स्विकार केला. या संदर्भात इ.स.१९५५ साली इंडोनेशियातील बांडुग शहरात संमेलन बोलाविण्यात आले पंडीत नेहरूंनी या संमेलनात एक महत्वपुर्ण संघटनकर्ता म्हणून योगदान दिले. तसेच बाडुंग समेलनात भारतीय प्रतिनिधी मंडळाच्या प्रभावातून शांतता, नि:शस्त्रीकरण, आणि युध्द या विषयाकडे लक्ष वेधण्यात आले. अलिप्ततावादी धोरणाला संघटनेचे स्वरूप देण्याच्या दृष्टीने इ.स.१९६१ बेलग्रेड येथे संमेलन बोलाविण्यात आले. हे संमेलन अत्यंत महत्वपूर्ण मानले जाते. कारण बाडुंग समेलनात मांडण्यात आलेल्या विचारांना मूर्त स्वरूप देण्याचे कार्य या संमेलनात करण्यात आले. पंडीत नेहरूंनी अलिप्ततावादाची भुमिका स्पष्ट केली. या संमेलनाचे महत्वपुर्ण वैशिष्ट्ये म्हणजे या पहिल्या समेंलनात संघटन, ऐतिहासिक निर्णय व त्यांची यशस्वीता मानली जाते. एकंदरीत पंडीत नेहरूंच्या सक्रिय योगदानामुळे बाडुंग संमेलनापासुन भारत अलिप्ततावादी राष्ट्रांचा मुख्य प्रवक्ता बनला. त्यामुळे पंडीत नेहरूंच्या कारर्किदित अलिप्ततावादी चळवळ हे त्यांच्या नावाने ओळखली जावु लागली. यावरून अलिप्ततावादी संघटनेच्या उभारणीत पंडीत नेहरूंच्या योगदानाची कल्पना येते.

**vii) पंडीत नेहरू : स्वंतत्र भारताचे परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावाद :–**

प्रत्येक राष्ट्र आपल्या परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करतांना राष्ट्रीय हित केंद्रबिंदू मानून निर्धारण करीत असते, म्हणून राष्ट्रहिताला परराष्ट्र धोरणाची गुरूकिल्ली म्हटले जाते. पंडीत नेहरूंनी परराष्ट्र धोरणाचे संचालन करतांना राष्ट्रहिताला आधारभुत घटक मानले होते. या संदर्भात पंडीत नेहरू म्हणतात की, 'कोणत्याही देशातील अंतर्गत धोरण आणि परराष्ट्रीय धोरण या दोन्हीचा आद्य हेतू देशाचे आणि देशांतर्गत जनतेचे हित साधण्याचा असतो'.[९] राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राथमिकता देवूनच पंडीत नेहरूनी अलिप्ततावादी धोरणाचा स्विकार केला होता. अलिप्ततावादाचे संस्थापक असलेले राष्ट्र भारत, इजिप्त व युगोस्लोव्हिया यांनी आपल्या राष्ट्रीय हिताच्या अनुषंगाने या धोरणाचा स्विकार केला. स्वंतत्र भारतासमोर अंतर्गत व बाह्यगत विविध आव्हाने होती. अंतर्गत दृष्ट्या ब्रिटीशांची जवळपास १५० वर्षे भारतावर राज्य केल्याने भारताची अर्थव्यवस्था पुर्णत: कोलमडलेली होती. तसेच संस्थानिकांच्या विलीनीकरणाचा प्रश्न, हिंदू– मुस्लीमांत सांप्रदायिक एकता निर्माण करण्याचा प्रश्न इ. तर बाह्यगत दृष्ट्या फाळणीयुक्त स्वातत्र्यांची प्राप्ती झाल्याने शेजारी पाकिस्तान सारखे शत्रु राष्ट्र , साम्यवादी क्रांती झाल्याने साम्यवादी चीन व बलाढ्य सोव्हियत रशिया हे शेजारी राष्ट्र होते. तसेच व्दितीय महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर शितयुध्दाचा उदय झाला. अशा परिस्थितीत भारताला आपला विकास करण्यासाठी शांतता, तंत्रज्ञानात्मक व आर्थिक सहायतेची आवश्यकता होती. तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा उत्तम अभ्यास व ज्ञान असणाऱ्या पंडीत नेहरूंना खात्री होती की, भारताचा विकास, राष्ट्रहिताची पुर्तता, दोन्ही महासत्तातील सत्तासंतूलन आणि नवस्वतंत्र आशियायी राष्ट्रांना आकर्षित करण्यासाठी एक स्वंतत्र निष्पक्ष आणि न्यायशिल गटाची स्थापना केली पाहिजे. म्हणूनच पंडीत नेहरू अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कार केला.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध प्रश्नांसंबधी भुमिका घेतांना किंवा विचार मांडतांना अलिप्ततावादी धोरणाचा माध्यमातुन राष्ट्रीय हितासोबत समन्वय साधन्याचा प्रयत्न पंडीत नेहरूंनी केला. इ.स.१९५६ साली निर्माण झालेल्या सुवेझ कालव्याच्या प्रश्नात पंडीत नेहरूंनी इजिप्तचा शासक नासेर यांच्या भुमिकेचे समर्थन केले. यामागे पंडीत नेहरूंचा भारताच्या आर्थिक व व्यापारी हितसंबंधाचे रक्षण करणे हा होता. तर अमेरिका प्रणित सिटो आणि सेंन्टो या लष्करी संघटनेला केलेला विरोध हा आदर्शवादी नसुन व्यवहारी होता. म्हणजेच या मागचा खरा उद्येश भारताची सुरक्षितता व आशियायी क्षेत्राची शांतता हा होता. इ.स.१९५६ साली निर्माण झालेल्या हंगेरी प्रश्नासंबंधी पंडीत नेहरूंनी घेतलेल्या भुमिकेची आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत मोठ्या प्रमाणात आलोचना झाली. मात्र या भुमिके मागचा वास्तविक उद्येश हा संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिक्षदेत काश्मिर प्रश्नी सोव्हियत रशियाचा पाठींबा मिळविणे हा होता. यासंदर्भात पंडीत नेहरूंनी स्वत:च्या भुमिकेचे स्पष्टीकरण करतांना म्हटले आहे की, "मी स्वाभाविकपणे भारताचे हित पाहिले. कारण की, हे माझे पहिले कर्तव्य आहे."[१०] थोडक्यात पंडीत नेहरूंनी राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी व जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी अलिप्ततावादाला भारतीय परराष्ट्र धोरणाचे केंद्रस्थानी स्थान दिले. त्यांनी स्विकारलेल्या अलिप्ततावादी धोरणाचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणावर पडल्याचे दिसून येते.

**viii) पंडीत नेहरू : जागतिक राजकारण आणि अलिप्ततावाद :–**

अलिप्ततावादाकडे दुसऱ्या महायुध्दांनतरची आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक महत्वपुर्ण घटना म्हणुन पाहिल्या जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणातील विविध घटना घडामोडीला प्रभावित करण्याचे कार्य अलिप्ततावादाने केले आहे. पंडीत नेहरूंना भारत आणि आशिया खंडाच्या प्राचीन गौरवशाली परंपरा संस्कृती आणि इतिहास यांचा अभिमान होता. त्यांना याची खात्री होती की, येणाऱ्या भविष्यकाळात भारत आणि आशिया खंडाला महत्वाचे स्थान प्राप्त होईल. पंडीत नेहरूंना भारत व आशिया बाबत असा विश्वास वाटण्याचे कारण की, त्यांना भारताच्या भूराजकिय महत्वाची स्पष्ट जाणिव होती. यासंबधी ५ सप्टेंबर १९४६ साली यांनी म्हटले आहे की, "भारताची सद्यकालीन स्थिती कशीही असली तरी ती एक संभाव्य बलाढ्य सत्ता आहे. आशिया आणि हिंद महासागर जास्त विशेषत्वाने मध्यपुर्व आणि आग्नेय आशियाच्या सुरक्षा विषयक प्रश्नात त्याला फार मोठ्या प्रमाणात भाग घ्यावा लागणार यात संशय नाही. अर्थात, भारत हा एक मध्यवर्ती अक्ष असुन त्याचे सभोवती त्या समस्येचा विचार करावा लागेल.''[११] यावरून आपणास लक्षात येते की, पंडीत नेहरूंना भारताच्या आशिया खंडातील भूराजकीय महत्वाबरोबरच आशिया खंडाची सुरक्षा विषयक जबाबदारीची जाणिव होती. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांनी अलिप्ततावादाचा मार्ग निवडला. कारण शेजारी चीन मध्ये साम्यवादी क्रांती झाल्याने रशियाची बाजू मजबूत झाली होती. इ.स.१९५४ मध्ये

अमेरिका–पाक यांचा लष्करी करार झाल्याने शितयुध्द भारताच्या दाराशी आले होते या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी पंडीत नेहरूंनी अलिप्ततावादाचा मार्ग निवडला.

पंडीत नेहरूंनी अलिप्ततावदाच्या माध्यमातून तत्कालीन जागतिक राजकारणावर आपला प्रभाव टाकला. आशिया आफ्रिकेच्या एकतेचा पुरस्कार किंवा इंडोनेशियाचे स्वांतन्त्र्य याबरोबच आंतरराष्ट्रीय विविध प्रश्नाबाबत घेतलेल्या भुमिकेमुळे पंडीत नेहरूंचा प्रभाव अधोरेखीत होतो. माईकल ब्रेशर यांच्या मते, ''पंडीत नेहरूंनी भारतीय परराष्ट्र धोरणाचे संचालन करतांना अलिप्ततावादाचे धोरण संपुर्ण जगासमोर मांडले आणि आपल्या संपुर्ण कारकिर्दीत त्यांनी निती निर्धारण प्रक्रियेला प्रभावित केले आहे.''[१२] इ.स.१९५० साली उद्भवलेल्या कोरीयन समस्येमुळे तिसऱ्या महायुध्दाची पार्श्वभुमी तयार होउ लागली होती. याप्रसंगी भारताच्या मध्यस्थीने कोरीयन प्रश्न सोडविण्यास मदत झाली. इ.स.१९५४ साली भारत चीन यांच्यात पंचशिल करार झाला या कराराने अलिप्ततावादाचा आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रभाव वाढविण्यास सहायभुत ठरले. त्यानंतर १९५६ सुवेझ कालवा प्रश्न व कांगो गृहयुध्द इ. प्रसंगी भारताने घेतलेल्या भुमिकेचा आंतरराष्ट्रीय जगात सन्मान झाला. यामुळेच सोव्हियत रशियाचे प्रमूख खुश्च्रेव्ह आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष केनेडी यांनी अलिप्ततावादाबाबतच्या आपल्या दृष्टीकोनात बदल घडुन आणला. हे अलिप्ततावादाचे मोठे यश समजले जाते. नि:शस्त्रीकरण, शितयुध्दाला दैतान्ताच्या अवस्थेत आणणे, संयुक्त राष्ट्राच्या सशक्तीकरणाचा पुरस्कार आणि विकसनशिल राष्ट्रामध्ये व्यापक स्तरावर आर्थिक सहयोगाचा पाया रचण्याचे कार्य अलिप्ततावादाने केले आहे.

पंडीत नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करीत असतांना त्यांनी स्विकारलेल्या अलिप्ततावादी धोरणाकडे दुर्लक्ष करून अभ्यास पुर्ण होणे शक्य नाही. पंडीत नेहरूंनी अलिप्ततावाद ही आंतरराष्ट्रीय राजकारणाला दिलेली महत्वपुर्ण देण समजली जाते. शितयुध्दोत्तर जागतिक राजकारणात अलिप्ततावादा ची प्रासंगिकता संपली आहे . असा विचार मांडण्यात येत असला तरी अलिप्ततावाद आणि नेहरूंच्या कार्याचे महत्व कमी होत नाही. पंडीत नेहरूंनी अलिप्ततावादाच्या माध्यमातून मांडलेला विचार व कार्याचा प्रभाव भारताचे परराष्ट्र धोरण आणि तत्कालीन जागतिक राजकारणावर पडला आहे. त्यांच्यानंतर सत्तेवर आलेल्या शासकांनी या धोरणाचा सातत्याने पुरस्कार केला. बदलत्या आंतराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात अलिप्ततावादाची प्रासंगिकता स्पष्ट करण्याचा प्रयत्न राजकिय नेतृत्व व राजकिय अभ्यासकांनी केला आहे. तसेच जागतिक नेतृत्वानेही त्यांच्या या कार्याची दखल घेतली आहे.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. बि.एल. फडिया – अन्तर्राष्ट्रीय राजनीति, साहित्यभवन पब्लिकेशन्स, आगरा २०१०, पृ.क्र.३०९
२. न.गो.राजुरकर आणि नरहर कुरूंदकर – मागोवा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००८ पृ.क्र.१६६
३. राधू पवार एवृमं आरजु मिश्रा – भारतीय विदेशी निती, आर्या पब्लिकेशन्स, दिल्ली पृ.क्र.१९९
४. राजेश कुमार चौहान – भारतीय विदेशी निती मे गुटनिरपेक्षता,राज पब्लिशिंग हाउस, जयपुर पृ.क्र.१६,१७
५. जवाहरलाल नेहरू – संपादक हरिभाउ उपाध्याय – मेरी कहानी, सस्ता साहित्य मण्डल, नई दिल्ली १९६५ पृ.क्र. ५३८
६. पी.डी.शर्मा – अन्तर्राष्ट्रीय राजनीति, कॉलेज बुक डेपो, जयपूर, १९८३ पृ.क्र.८२३
७. भा.ल.भोळे – आधुनिक भारतातील राजकिय विचार , पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लीशर्स, नागपूर पृ.क्र.७४५
८. चंद्रशेखर दिवाण – भारताची विदेश निती, विद्या प्रकाशन नागपूर. पृ.क्र.७५
९. कित्ता क्र २ पृ.क्र. १६४
१० कित्ता क्र ४ पृ.क्र. ११८
११ कित्ता क्र ८ पृ.क्र. ७१
१२ कित्ता क्र १ पृ.क्र. ३१० व ३११